(Marathi)

1028
9/71

1585

3

P

Chhatrapati Sambhaji Mela Padyavali
1585 Mar
IMPERIAL RECORD DEPT. RECEIVED 2 FEB 1932

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# छत्रपति संभाजी मेळा



## पद्यावली.

प्रकाशकः—चंद्रकांत मारुतीराव काळभोर (मिठाईवाले)
घ. नं. २७१ नारायण, पुणे.

1585 M

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1585
Date 12-1-72
GOVT. OF INDIA

॥ श्री दत्त प्रसन्न ॥

वंदे मातरम् !                                                    वंदे मातरम् ! !

# सतत पन्नास वर्षें पुण्यांत नांवाजलेलें
# मिठाईचें दुकान.

आमचे येथें अगाऊ ऑर्डर दिल्यास शुद्ध स्वदेशी साखरेचे पेढे, बर्फी वगैरे माल ४ तासांचे आंत देऊं.

**मालाचे भाव.**

फिक्की बर्फी १ रुपया शेर

केसरी पेढे १। ,, ,,

फिक्के पेढे १ ,, ,,

मालक,
**मारुतराव रामभाऊ काळभोर,**
( घ. नं. २७१ लकडीपूल ,पुणें. )

---

आमचेकडे इमारतीचीं नवीं जुनीं सर्व कामें, फ्लशिंग संडास, ड्रेनेज लाइन नळ फिटींगचीं कामें उत्तम व योग्य खर्चांत ठरलेल्या मुदतींत करून देऊं. अनुभव घेऊन पहा.

**जोतीबा नागाप्पा मिस्त्री,**
रविवार ८६६ पुणें

॥ गजानन प्रसन्न ॥



# छत्रपति संभाजी मेळा.

## पद १ लें.

संग्राम देवतेला । नमन पदकमला ॥ धृ० ॥
वक्रतुंड गणराज गजानन । शंकरतनयाला ॥ १ ॥
कंस रिपुसी जो संहारी । त्या यदू राजाला ॥ २ ॥
महिशासुरमर्दीनी भवानी । देवी मातेला ॥ ३ ॥
धर्मास्तव स्व आहूती दिधली । त्या संभाजीला ॥ ४ ॥
रामदास श्री साधुसंता । त्या गुरु चरणाला ॥ ५ ॥
अटकेवरति फडकुनि आला। भगव्या झेंड्याला ॥ ६॥
स्वराज्यास्तव प्राण अर्पिले । त्या हुतात्म्याला ॥ ७ ॥
स्वराज्य पंथ हा सोज्वल कर्ता । त्या बलवंताला ॥ ८ ॥
स्वातंत्र्याचा खेळ खेळले । त्यांच्या आत्म्याला ॥ ९ ॥
राष्ट्रास्तव जो फकिरी घेई । त्या गांधीजीला ॥ १० ॥
स्वराज्यास्तव विनंति करतो । संभाजी मेळा ॥ ११ ॥

**पद २ रें ( चालः—झाला हीन देश आपुलारे )**

कैसा विसर तुम्हां पडला हो। तुम्ही धर्म नीति भुलला हो ॥ धृ०॥
स्वधर्माची करी हेलना। परधर्माची गोडी ॥
रीत रिवाजा सोडुन देतां। शराब शिंदी झोडी ॥ १ ॥
नाटक सिनेमा हौस वाटली। सिगारेटला ओढी ॥
बड बड बड बड करी मुखानें। म्हणे बहादूर मी गडी ॥ २ ॥
ओठांवरती मिशी नाहीं। डोई भांग तिरपा ॥
पोशाखाची ऐट पहातां। काय याची अक्कल पहा ॥ ३ ॥
नानापरीचे व्यसनाधीन। केली मनाची हौस ॥
शेवटीं जागृत होऊन काय। काळ नेई स्मशानास ॥ ४ ॥
जोंवरी शक्ती तोंवरी भक्ती। साधा कांहीं कार्या ॥
मातृ-पितृ देशाची भीति। लाज राखा आर्या ॥ ५ ॥
नामें किर्तीरूपें उरावें। बोध रामदास ॥
केकान विनवी बंधुजनाप्रति। धरा नितीची कांस ॥ ६ ॥

---

**पद ३ रें. ( चाल—कवाली )**

विराजे हिंदभूमीच्या, गळीं जो दिव्य ताईत ॥
नमूं आम्ही महाराष्ट्रा, मूदे ज्या सर्व जगतांत ॥ धृ० ॥
विठोबा तिष्ठतो जेथें। सदा भक्ताचिया काजा ॥
कृपेनें उद्धरी लोकां। मराठ्या स्फूर्ती दे तुजला ॥ १ ॥
गर्जली ज्ञानदेवाची। समर्थांची तशी वाणी ॥
तुकोबा नाचले जेथें। मयूरे गाईलीं गाणीं ॥ २ ॥
भरोनी वहाते कृष्णा। मधे सह्याद्री तो ठेला ॥
भवानीची शिवाजीच्या। जयानें पाहिली लीला ॥ ३ ॥

धडाडी वीर मर्दांची । शिवाजीच्या मराठ्यांची ॥
बघोनि घाबरे शत्रू । शिजेना डाळ परक्यांची ॥ ४ ॥
परी दुर्दैव ओढवलें । सुखाचा काल जो जाई ॥
स्वकियांनीं घात केला । बुडाली हिंदु पातशाई ॥ ५ ॥
महाराष्ट्रास परक्यांनीं । लुटोनी घातले घाव ॥
आडविली ओसरी सारी । पसरले पांढरे पाय ॥ ६ ॥
नभोभागी फडकवा हा । भगवा जरतारी पटका ॥
नसे सामर्थ्य कोणाचें । तयाला लावण्या धक्का ॥ ७ ॥
गदा घाये परकियांच्या । नसे मेला महाराष्ट्र ॥
असे गर्जून बोलूंया । नसूं आम्हीं महाराष्ट्र ॥ ८ ॥

---

### पद ४ थें. ( चाल—तूं टाक चिरुनि )

तूं ऊठ तरुण भारता तारि माता । परदास्य यातना
असह्य होती कोणी न का त्राता ॥ धृ० ॥
घडी घडी होय अपमान । हिंदूंत नाहीं का त्राण ।
परक्याचें पादत्राण निशिदिनीं शिरावर घाव ।
ठोकिती किती सहन करितां ॥ १ ॥
परदास्यमुक्त होण्याला । जो दोस्त नवा शोधियला ।
तो मस्त सापची ठरला ।
पदरांत निखारा कसा घेतला दहन करिल आतां ॥ २ ॥
रामदास गुरुनें कथिला । तो मंत्र कसा विस्मरला ।
तो इथें नाद दुमदुमला ।
जा मरा मारुनि धर्म रक्षणा हर हर हर बोला ॥ ५ ॥

---

### पद ५ वें. ( चाल—मला मुंबईला )

जसें वाहील वारें तशीच पाठ फिरवारे ॥ धृ० ॥ पहिला हुजूर पक्ष । शोधी आपलें भक्ष । तुंबडी भरण्या दक्ष । सरकारपुढें. हो नाचती मोर ॥ १ ॥ पुढील पायरी नेमस्त । मागत थबकत बिचकत । खुश मिळेल तेवढयांत । राष्ट्रसभा निर्माण केली घोर ॥ २ ॥ पुढें जहाल आले । टिळक तुरुंगीं गेले । राष्ट्रसभा डोले । सरकारासी हो लागला घोर ॥ ३ ॥ इथुन सुरवात झाली । जनता तयार केली । कायदा पाया-खालीं । घालून म्हणती आहे बरोबर ॥ ४ ॥ गांधीजीचे: धागे । लागले परक्यामागें । मीठ करूं लागे । सरकार झालें त्यानीं चिंतातुर ॥ ५ ॥ साहेबांचा विचार । बदलून गेला पार । मनीं शोधीलें सार । अवघे सोडून दिधले वीर ॥ ६ ॥ समेटाचा विचार । साहेब करतो जाहीर । गांधी पुढें पदर । पसरूनी नेतो गोल मेजावर ॥ ७ ॥ गोल मेजावर । राज्य. थोडें फार । देईल काय सरकार । नाहीं ऐसें मनीं उत्तर ॥ ८ ॥ नाहीं जरी अवतार । राष्ट्र पुरुष झुंझार । देणें त्यासी धीर । होईल राष्ट्राचा जयजयकार ॥ ९ ॥

---

### पद ६ वें. ( चालः—बाळ टिळक पुणें शहरीं )

झाला भिकारी सोडोनिया बॅरीस्टरी ॥ धृ० ॥ वैभवास त्यजीण्या-लागी । पाहिजे योगी बैरागी । हे काम नव्हे हो ढोंगी । धडाडी भारी ॥ १ ॥ हातांत घेवुनी च्याप । पिंजूनीया कापुस खूप ॥ चक्रावरी काढी सूत । निघे घरोघरी ॥ २ ॥ सुताचे झाले भूत । मॅन्चेस्टर केलें चीत । बेकारी झाली बहूत । पांचचैन्य करी ॥ ३ ॥ खावूनी गांधीचें मीठ । जनता ती झाली धीट । तुरुंगांची धरली वाट । हजारा वरी ॥ ४ ॥ तुरंगाची केली हेटाळी । हातांत घेवुनी टकळी । टकळीनें

घातली गोळी । शांतचिी भारी ॥ ५ ॥ बैरागें केली मात । नोकरशाही झाली चीत ॥ बोलली समेटी बात । सोडी शिरजोरी ॥ ६ ॥ सांभाळी आपली माया । दावीसी कासया भया ॥ गांधीच्या लागली पाया । देई ललकारी ॥ ७ ॥ भिकारी होवूनी त्यागी । आपुलेची आपणा मार्गी ॥ हिंदुस्थाना सोडण्या सांगी । गोल मेजावरी ॥ ८ ॥

---

**पद ७ वें. ( चालः—नागिणी चपल )**

मतिमंद कसे तुम्ही बनला । स्वशीलाला विसरूनी गेला ॥ धृ० ॥ भारतखंडापासूनी शिकले । राष्ट्रमणी ते चमकूनी गेले । पाषाण कोरडे उरला । । स्व० ॥ १ ॥ पैशासाठीं धर्म बुडविणें । मान मिळविण्या पैसे भरणें । हे योग्य नसे भारताला । स्व० ॥ २ ॥ बेकीनें आजी गृह हें धुतलें । सर्व वैभवा ओढोनी नेलें । आकाश बघत तुम्ही बसला । स्व० ॥ ३ ॥ यत्न करूनी तुम्ही जागृतीवरी या । वैभव आपलें परतुनी घ्याया । स्वातंत्र्य माळ गळीं घाला । स्व० ॥ ४ ॥

---

**पद ८ वें.**

कांहीं करी सुविचार—भारता कांहीं करी सुविचार। पूर्व वैभवा स्मरूनि करणें तुलाच आत्मोद्धार ॥ धृ० ॥ हें स्वातंत्र्याचें गीत गात हिंडती। खग नभीं तुला कां ऐकूं नये संप्रती । दे निशा सोडुनी जागा हो सांगाती । ऊठ करी सुविचार । या पुढें। ऊठ करी सुविचार। स्वातंत्र्याची पहाट फुटली गेला अंधःकार ॥ १ ॥

बघ जगाकडे तूं नजर फेकुनी जरा । वैभवांत नटलीं राष्ट्रें गुण गंभिरा । तूं मात्र अभागी बंदीवान पामरा । दुबळा होशी अपार ।

दुहीनें । दुबळा होशी अपार । तरी अजुनि का भुलवी झुलवी परकीय जादुगार ॥ २ ॥

स्वातंत्र्य भीक कधीं कुणीं कुणा घातली । मर्दानी दुनिया आजवरी हटविली । निज इच्छामात्रे रंग छटा खुलविली । इतिहासाचें सार । भारता । इतिहासाचें सार । स्वावलंबनें स्वतंत्र होउनी करणें राष्ट्रोद्धार ॥ ३ ॥

तव भूतकाळचा कीर्तिध्वज फडकतो । हा भविष्य मंगळ रूप रंग दावितो । परी वर्तमान हा तुझ्यापुढें नांदतो । घडवी तो भरदार । पराक्रम । घडवी तो भरदार । नरकरणीनें नारायण हें व्यवहाराचें सार ॥ ४ ॥

---

पद ९ वें. ( चालः—चल बिव्या मावळ प्रांतांत )

बं बं बोला गिरीजावरा । तन मन धन प्रभुशि वरा ॥ धृ० ॥ बाळ दयाळा तुझा हा गणपती । शुंडे धरी हरी पाडितो क्षिती । वीर लालवर झळके मोती । प्रभा फाके नेत्रें दिपती । अंतरी धराहरा । अंतरीं धराहरा ॥ १ ॥

धन्य माय तूं अधी भवानि । शिवरायाच्या यशा पेरणी । तोडुनी चमु असी पाडी मेदीनी । झेंडा फडके भगवा बाणी । ह्यावर सुंदरा नवा अंतरा । ह्यावर नवा अंतरा ॥ २ ॥

धन्य धन्य जगीं टिळक गांधीजी । जवाहरलाल मधें कोंदनी । वीर मिळाले भारता रणी । जगीं या खरा पै पसारा । जगीं या खरा पै पसारा ॥ ३ ॥

---

पद १० वें. ( चालः—परवशता पाश दैवे )

प्रभु दाता कोणी त्राता नाहीं आम्हा राहिला ॥ धृ० ॥
दैवगती उलटी फिरली ॥ काळ कठीण आला ॥ १ ॥

शूर वीर बच्चे म्हणण्या । लाज ये मनाला ॥ २ ॥
शक्ती नुरली प्रतिकाराची । राग काय मेला ॥ ३ ॥
चीड ये न अपमानाची । धिक् अशा जिण्याला ॥ ४ ॥
जगतीं कवडी किंमत नुरली । हिंदवासीयाला ॥ ५ ॥
स्वजन परजने तुडवावे । स्वतंत्र आम्हाला ॥ ६ ॥
दास दास म्हणुनी वदती । नरकवास झाला ॥ ७ ॥
चरणीं शरण तुजला यावें । हाची मार्ग उरला ॥ ८ ॥

---

**पद ११ वें. ( चालः—परवशता पाश दैवे )**

दास्याचा घोर घाला । आला कली मातला ॥ धृ० ॥
निरपराधी फांशी जाती । खंत ना कुणाला ॥ १ ॥
नाहीं गुन्हा घडला कांहीं । तरीहि दंड त्याला ॥ २ ॥
धन्य तोचि देशासाठीं । वाही जो जिवाला ॥ ३ ॥
राष्ट्रकार्य यज्ञामाजि । प्राण होमियेला ॥ ४ ॥
सफल सकल जीवित त्याचें । धन्य वंश केला ॥ ५ ॥
मरुनि उरे कीर्तिरूपे । अमर तोचि झाला ॥ ६ ॥
कर्मयोग श्रीकृष्णानें । हाचि वर्णियेला ॥ ७ ॥
ज्ञानदेव तुकया यांनीं । सकला बोध केला ॥ ८ ॥
देवधर्म एकचि ज्यानें । देश मानियेला ॥ ९ ॥

---

**पद १२ वें. ( चालः—निजला कैसे )**

कां गोपाला । यदुराया संकटकाला । रुसला हो घननीळा ॥ धृ० ॥
भारत भू माय अपुली दीन झाली ।

परक्यांची हीन दासी आज बनली ।
अपमान शस्त्र हें जहरी । लांछन बघ हृदय विदारी ।
कशी करुणा । श्री रमणा । ये तुज ना ।
का करुणासिंधू आटला । रुसला हो घननीळा ॥ १ ॥
तव गीताधर्म सारा लुप्त झाला ।
पाखंडी बंड आतां ये उताला ।
माराया सद्धर्माला । चौफेर चढविती हल्ला ।
परक्यांचे हस्तक जे । तोंडपुजे ।
संहरि घे अवताराला । रुसला हो घननीळा ॥ २ ॥

---

**पद १३ वें. ( चालः—कधि प्रभुवरा )**

प्रभो दाखवी भारतभूला । स्वातंत्र्याची मंगल वेळा ॥ धृ० ॥
परवशतेची निशा संपवुनि । उदित करी झणीं भाग्यरवीला ॥ १ ॥
आळस दुबळा मारुनी सकळा । मार्ग यशाचा करी मोकळा ॥ २ ॥
स्वातंत्र्याच्या मंगलगानीं । सदैव वाटो मोद मनाला ॥ ३ ॥
भारतीय संस्कृति पुन्हा ही । भूषण होवो सर्व जगाला ॥ ४ ॥

---

**पद १४ वें. ( चाल— पहा बंधुनो )**

असा आला हा घाला कशाला । हिंदुधर्म गेला । ग्रासि कली त्याला ॥ धृ० ॥ धर्म-रक्षणीं । भारत भुवनीं । बहु दक्ष नृपमणी । मिळवि कीर्तीला ॥ १ ॥ श्रीशिवाजीनीं । राज्य स्थापुनी । आर्यधर्म रक्षुनी । साम्राटपदीं गेला ॥ २ ॥ देश धर्म हा । दीन हो महा । नयन उघडुनी

पंहा । समुळ बुडाला ॥ ३ ॥ धुगधुगी कशी । मुळीं ही नुरलशी ।
नवजीवन त्यासी । द्या हो या काला ॥ ४ ॥

---

पद १५ वें. ( चाल—ही पाखंड अवलाद )

शुद्धबीज तें कसलें स्त्रियांच्या अब्रुवर उठले ॥ धृ० ॥
स्वस्त्रीवांचुनी इतर आपुल्या आयाबहीणी समजा ।
स्त्री जातीच्या पातिव्रत्यावर साऱ्यांच्या या गमजा ॥
जनहो हाची बोध समजा ॥ १ ॥
रावण मेला धडपडला तो सुयोधनही कुरुराणा ।
अबलेवरती हात टाकतां तुटेल तेथें जाणा ॥
हा तर मराठीच बाणा ॥ २ ॥
खरा मराठा वीर शिवाजी काय तयानें केलें ।
यवनी सुंदर दिसतां तिजला माय म्हणुनी वन्दिलें ॥
त्याचें नांव अमर झालें ॥ ३ ॥
तेच मराठे आतांचेही तत्त्व हें न सुटणार ।
विरुद्ध जाईल कमअस्सल तो समजा हरामखोर ॥
त्याला मारा पैजार ॥ ४ ॥
जन्म जाहला जिथुन जात ती वंद्य सर्वथा लोकीं ।
असो ब्राह्मणी यवनी खिस्ती अबला पूज्य जना कीं ॥
आदर पूर्ण तिचा राखीं ॥ ५ ॥
करुनि जिवाची होणी अबला रक्षावी मर्दानें ।
वैऱ्याची हो रणीं न दुखविणें यांतच भूषण धरणें ॥
हेंची वीरांचें लेणें ॥ ६ ॥

स्त्री-छळ होतां दुष्टा हातीं स्वस्थ राहोनी पाहे ।
थुः त्याचें पौरुष हो कसलें लाज तयाला का आहे ॥
त्याचें जिणें सार्थ नोहे ॥ ७ ॥

---

**पद १६ वें. ( चालः—तूं टाक चिरुनि ही मान )**

कधिं हिंदू एक होणार । शपथ घेणार
मातृभूमीच्या दास्यमोचना प्रतिक्षणीं झटणार ॥ धृ० ॥
जन्मलों वाढलों जेथें । खेळलों राहिलों तेथें ।
ती भूमि होय संत्रस्त । दास्य शृंखला तिच्या तोडण्या
यत्न कधीं करणार ॥ १ ॥
भीरुत्व सर्व सोडोनी । वीरांच्या वृत्ती करोनी
स्वातंत्र्य मंत्रा जपूनी । परवशतेच्या लांछनतेची
चीड कधी येणार ॥ २ ॥
आपसांत पाडण्या फूट । शत्रुशी करीति कूट
यावरीच ज्यांचें पोट । अशा नराना मानव कैदी
कोणी नाहीं म्हणणार ॥ ३ ॥
मानिले जेथें देशाला । राखोनि वीर बाण्याला ।
मानींला शिव टिळकाला । मातापीता उदरीं जन्मूनि
धन्य तोचि ठरणार ॥ ४ ॥

---

## पद १७ वें. ( चालः—पांडवा सम्राटपदाला. )

देश माझा प्रिय मला हा देश एकचि आसरा ॥ धृ० ॥
देशकार्यीं श्रीशिवानें देह आपुला लाविला ।
भारता स्वातंत्र्य शेला पांघराया घातला ॥ १ ॥
वीर तान्हा तिलक भाला हिंदभूच्या शोभला ।
सार्थ केलें नांव जगतीं कीर्तीरूपें राहिला ॥ २ ॥
सिंह—छावे असुनि तुम्ही स्वस्थ कैसे निजला ।
मोह निदी टाकूनि द्या नेत्र उघडा ॥ ३ ॥
देश ऐसा घोष करूनि सिद्ध व्हावें संगरा ॥

---

## पद १८ वें.

नोकरशाहीवाले आतां लेखन ठेवा खालीं ॥ धृ० ॥
पैशासाठीं गुलाम बनला टोपीवाल्याचे ॥
फितुरी देऊनी राज्य घालविलें पेशवे सरकारानें ॥ १ ॥
हिंदुस्थानाचें झालें वाटोळें तुमच्या नादानें ॥
भ्रष्टकार हा तुम्हीं केला हाटेल झाल्यानें ॥ २ ॥
भगवा बाणा शिवाजी राणा मदत आपुल्याला ॥
सर्व मिळुनी हर हर बोला हाटवूं गोऱ्याला ॥ ३ ॥
सर्व मिळुनी प्रार्थना करूनी हिंद मातेला ॥
सत्पुरुष तो महात्मा गांधी मान दिला टिळकाला ४ ॥

---

॥ श्री दत्त प्रसन्न ॥

॥ वंदे मातरम् ॥ ॥ वंदे मातरम् ॥

॥ स्वस्ताईची कमाल ॥ ॥ स्वस्ताईची कमाल ॥

## दि न्यू टेलरिंग फर्म, पूना.

आमचे येथें कपडे वेळेवर व काळजीपूर्वक शिवून मिळतील. तसेंच आयते शिवून ठेवलेले कपडे व कापडही स्वस्त दरांत मिळेल.

मालक
जे. के. परदेशी,
( घ. नं. २७५ नारायण पेठ, पुणें )

---

## पवार विडी वर्क्स

आमचे इकडे अकोली तंबाखूच्या कडक, मध्यम व साफ विड्या ठोक व किरकोळ आणि स्वस्त दरांत मिळतील व तंबाखु जर्दा, काळा जर्दा योग्य दरांत मिळतील. अनुभव घेऊन खात्री करा.

पत्ता—रे मार्केट गाळा नं. ५१६
इराण्याच्या हॉटेल समोर; पुणें.



| | |
|---|---|
| **केरमबोर्ड्स्** | प्रत्येकीं, किं. रु. १०, १२ ते २५. |
| केरम ड्राफ्टस् पॉलिश्ड | सेट किं. रु. १।।।; २. |
| केरम ड्राफ्टस् साधे | सेट किं. रु. ॰।।॰, ।।।॰, १, १।. |
| केरम स्ट्रायकर | प्रत्येकी किं. ॰।।।॰ १. |
| बॅडमिंटन बॅटी | प्रत्येकीं किं. रु. १।।, २, २।, ते ५. |
| बॅडमिंटन फुलें | डझन किं. रु. ५, ७ ते १२. |
| बॅडमिंटन जाळीं | प्रत्येकी किं. रु. १।।, १।।।, ते ४।।. |
| बॅडमिंटन रींगटिंग | किं. रु. ।।।, १, १।, १।।॰ |
| पिंगपाँग बॉल्स | डझन किं. रु. १।।, २। ते ४।।॰ |
| पिंगपाँग बॅटी | प्रत्येकी किं. रु. १, १। ते २।।. |
| पत्त्याचे डाव | प्रत्येकी किं. रु. ८-, ८=, ।', ।= ते ।।' |

**साठे स्पोर्टस्**

डेक्कन जिमखाना पोस्टाजवळ,

पुणें नं. ४.

---

मुद्रकः—**लक्ष्मण भाऊराव कोकाटे,** हनुमान प्रेस,
३०० सदाशिव पेठ, पुणें.